## इन्स्क्रिप्ट आराखडा

- हा आराखडा बाराखडीच्या रचनेवर आधारलेला आहे.
- डाव्या हाताला स्वरचिन्हे आणि उजव्या हाताला वर्गीय व्यंजनांची चिन्हे ही ह्यातील प्राथमिक रचना आहे.
- शिफ्ट-कळ न दाबता जिथे क उमटतो तिथेच शिफ्ट-कळ दाबून ख उमटतो.
- शिफ्ट-कळ न दाबता जिथे ा (काना) उमटतो तिथेच शिफ्ट-कळ दाबून आ हे स्वतंत्र स्वरचिन्ह उमटते.
- क-ख कळीच्या लगत वरच्या कळीवर ग-घची कळ दिलेली आहे.
- ऱ्हस्व स्वराच्या कळीच्या लगत वरच्या कळीवर दीर्घ स्वराची कळ आहे.
- व्यंजन + पायमोड (्) + व्यंजन ह्याच पद्धतीने सर्व जोडाक्षरे लिहिता येतात.
- हा आराखडा आत्मसात करताना आणि वापरताना इतर आराखड्यांच्या तुलनेत वेळ आणि श्रम कमी लागतात.
- केंद्रशासनाने हा आराखडा भारतीय भाषांसाठी प्रमाणित केलेला आहे.

संगणकावरील मराठी टंकलेखनासाठी इतरही काही आराखडे वापरण्याच्या सोयी उपलब्ध आहेत. उदा. खालील दुव्यांवरील साधने
http://bhashaindia.com/Downloads/Pages/home.aspx
http://www.google.com/transliterate/Marathi
परंतु प्रमाणीकरणाच्या आणि वेळ व श्रम वाचवण्याच्या दृष्टीने इन्स्क्रिप्ट हाच आराखडा आत्मसात करणे इष्ट आणि आवश्यक आहे.

## युनिकोड-आधारित टंक

मंगल, एरियल-युनिकोड-एम्‌एस, गार्गी इत्यादी विविध युनिकोड-आधारित असे मराठीचे टंक (फॉण्ट) सध्या उपलब्ध आहेत. त्यांतील काही टंक महाजालावरून विनामूल्य उतरवूनही घेता येतात.
उदा. संस्कृत २००३ हा टंक खालील संकेतस्थळावर विनामूल्य मिळतो.
http://www.omkarananda-ashram.org/Sanskrit/itranslator2003.htm

## मराठी मजकूर आणि संगणकीय प्रक्रिया

युनिकोड-संकेतप्रणालीमुळे संगणकावर आणि महाजालावर मराठी मजकुराची देवाणघेवाण आणि इतर प्रक्रिया सहजसोप्या झाल्या आहेत.
उदा. http://www.google.co.in/webhp?hl=mr हा दुवा वापरून गूगलच्या शोधयंत्रणेत (सर्च-इंजिनात) देवनागरी मजकूर घालून केवळ मराठी भाषेतील माहितीची पाने शोधून मिळतात. भाषाविशिष्ट शोध घेता येतो.
http://ildc.in/Marathi/mdownload2000.html ह्या संकेतस्थळावर मराठीसाठीची काही साधने उपलब्ध आहेत. त्यांपैकी परिवर्तन http://ildc.in/Marathi/tools/5.htm हे साधन वापरून इतर टंकात तयार केलेला मजकूर युनिकोड-संकेतात बदलता येतो.

- संगणकावर युनिकोड-आधारित मराठीचा गुणवत्तापूर्ण वापर होण्यास साहाय्यभूत व्हावे ह्या हेतूने प्रशासकीय अधिकारी, राज्य मराठी विकास संस्था ह्यांनी हे पत्रक जनहितार्थ प्रकाशित आणि वितरित केले आहे. (२७ फेब्रुवारी २०१२ : मराठी-भाषा-दिन)

लेखन : सुशान्त देवळेकर (कनिष्ठ संशोधन-साहाय्यक, राज्य मराठी विकास संस्था)
संस्थेची अधिक माहिती व प्रकाशने ह्यांसाठी संस्थेचे संकेतस्थळ पाहावे
http://rmvs.maharashtra.gov.in/rmvs/

- आपण उच्चार करतो त्या क्रमाने अक्षरे लिहा. : उदा. कविता = क + व + ि + त + ा
- जोडाक्षर लिहिण्यासाठी दोन व्यंजनाक्षरांच्या मध्ये पायमोडीची (्) खूण घाला.
  उदा. क्क = क + ् + क, द्ध = द + ् + घ
- पऱ्या मधील ऱ लिहिण्यासाठी ऱ (shift + J) लिहून पाय मोडा. : उदा. ऱ्य = ऱ + ् + य
- काही टंकात ही खूण नीट दिसत नाही. तेव्हा इतर टंक वापरावेत.
- ?, "", '', !, -, +, <, > इ. चिन्हे इनस्क्रिप्टाच्या मराठीच्या आराखड्यात नाहीत. ही चिन्हे लिहिण्यासाठी इंग्रजीचा कळपाट निवडा. त्यासाठी Alt आणि Shift ह्या कळा एकत्र दाबा. विरामचिन्हे लिहिल्यावर पुन्हा मराठीत येण्यासाठी Alt आणि Shift ह्याच कळा पुन्हा एकत्र दाबा.
- ॲ ही खूण काही टंकांत ०९७२ ह्या क्रमांकावर उपलब्ध असते. ती कॅरेक्टरमॅपमधून घ्यावी.
- ज्या टंकात ती दिलेली नसेल तिथे अ + ZWJ (झिरो विड्‌थ जॉयनर) + ॅ असे लिहून दिसण्यापुरती ॲ ही खूण वापरता येते. त्यासाठी रेक्टरमॅपमध्ये zero width joiner असे शोधून ती अदृश्य खूण नकलून D अ आणि ॅ ह्यांच्या मध्ये डकवा.




**राज्य मराठी विकास संस्था**
(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय,
३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१.
रजि नं. एफ १६०९४ (मुंबई)
दूरध्वनी : २२६३१३२५/ फॅक्स : २२६५३९६६
ई-टपाल :
rmvs_mumbai@yahoo.com


मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

## संगणकावर मराठीचा सहज वापर

आपल्या संगणकावर जी कोणती कार्यकारी प्रणाली (ऑपरेटिंग सिस्टिम) असेल आणि ती साधारणतः २००० ह्या वर्षानंतरची असेल तर त्यात मराठी लिहिण्या-वाचण्याची सोय मुळात दिलेलीच असते. विंडोजच्या एक्सपी आणि त्यांपुढील आवृत्त्या ह्यांसारख्या स्वामित्वाधीन (कॉपिरायटेड) कार्यकारी प्रणाल्यांत तसेच लिनक्सच्या रेडहॅट, उबुण्टू इ. मुक्तस्रोत (ओपनसोर्स) कार्यकारी प्रणाल्यांत मराठी लिहिण्या-वाचण्याची ही सोय उपलब्ध असते. तसेच त्यासाठी लागणारे काही टंक (फॉण्ट) सुद्धा उपलब्ध असतात.

- आता आपल्या संगणकावर मराठी लिहिण्या-वाचण्यासाठी कोणतीही बाहेरची आज्ञावली/ प्रमाणेतर टंक बसवण्याची आवश्यकता नाही.
- मराठी वापरण्याची सोय आपल्या कार्यकारी प्रणालीतच दिलेली असते.
- ही सोय वापरण्यासाठी अधिकचा एक पैसाही वेचावा लागत नाही.
- ही सोय वापरून तयार केलेला मराठी मजकूर दुसऱ्या संगणकावरही सहज दिसू शकतो, सहज वापरता येतो. त्याची देवघेव सहज करता येते.
- संकेतस्थळावर असा मजकूर घातला तर तो इतरांना सहज पाहता येतो.
- गूगल इ. शोधयंत्रणांत (सर्च-इंजिनांत) मराठी मजकूर घालून महाजालावरील मराठीतील माहिती शोधता येते.

ह्या उपरोक्त सोयीत संगणकावर मराठी मजकूर साठवताना तो युनिकोड ह्या संकेतप्रणालीत साठवण्यात येतो. जगातील बहुसंख्य लिप्यांतील चिन्हांना प्रत्येकी एक स्वतंत्र क्रमांक देणाऱ्या ह्या संकेतप्रणालीमुळे संगणकाला देवनागरी लिपिचिन्हे ओळखणे आणि त्यावर प्रक्रिया करणे शक्य झाले आहे.
संगणकावर भारतीय भाषा लिहिण्यासाठी (टंकलिखित करण्यासाठी) केंद्रशासनाने प्रमाणित केलेला आणि बाराखडीच्या रचनेवर आधारलेला इन्स्क्रिप्ट हा टंकलेखनाचा आराखडा कार्यकारी प्रणाल्यांत समाविष्ट केलेलाच असतो.
ह्या दोन सोयींमुळे संगणकावर युनिकोड-आधारित मराठीचा वापर अगदी सोपा झाला आहे !

# मायक्रोसॉफ्ट विंडोजमध्ये मराठी वापरण्याची सोय

## विंडोज एक्स्पीत मराठी वापरा

०१. संगणकातील पुढील खुणांवर क्रमाने टिकटिकवा (क्लिक करा). Start > Control panel > Regional and Language options. चित्र : १ मध्ये दाखवल्याप्रमाणे एक चौकट उघडेल.
०२. तिच्या वरच्या भागातील Languages ह्या खुणेवर टिकटिकवा.
०३. चौकटीत Supplemental language support ह्या भागातील दोन पर्यायांपैकी Install files for complex script and right-to-left languages (including Thai) हा पहिला पर्याय निवडला आहे का हे पाहा.
तो निवडलेला असेल तर त्या संगणकावर मराठीचा पर्याय आधीच कार्यरत आहे असे समजावे. जर उपरोक्त पर्याय कार्यरत केलेला नसेल तर तो कार्यरत करून घ्यावा लागतो. त्यासाठी विंडोज एक्स्पी बसवण्याची चकती (इन्स्टॉलेशन-सीडी) ५ मिनिटांकरता वापरावी लागेल. ती तयार ठेवा.



चित्र : १

०४. वर सांगितल्याप्रमाणे ०१, ०२ ह्या कृती करून चित्र :१ मध्ये दाखवल्याप्रमाणे चौकट उघडा.
०५. विंडोज एक्स्पीची चकती (सीडी) चकतीच्या खणात (सीडी-ड्राइव्हमध्ये) घाला.
०६.चौकटीच्या Supplemental language support ह्या भागातील Install files in complex and right-to-left languages (including Thai) हा पर्याय निवडून Apply आणि OK ह्या खुणांवर क्रमाने टिकटिकवा.
०७. 'संगणक पुन्हा सुरू करा' अशी सूचना आल्यावर संगणक बंद करून परत सुरू करा. तो सुरू झाल्यावर पुढीलप्रमाणे कृती करा.
०८. संगणक परत सुरू झाल्यावर वर सांगितल्याप्रमाणे ०१, ०२ ह्या कृती करून चित्र: १ मध्ये दाखवल्याप्रमाणे चौकट उघडा.
०९. ह्या चौकटीतील Details ह्या खुणेवर टिकटिकवा. (चित्र : १)
१०. Text services and Input Languages ही नवी चौकट उघडेल (चित्र : २)
१०. ह्या चौकटीतल्या Add ह्या खुणेवर टिकटिकवल्यावर Add Input Language अशी एक लहान चौकट उघडेल. (चित्र : ३)

११. त्यात Input language ह्या मथळ्याखालील चौकटीतल्या भाषांच्या सूचीत Marathi ही खूण निवडून OK ह्या खुणेवर टिकटिकवा.



चित्र : २

१२. आता कार्यदर्शिकेवर (टास्कबारावर) पाहा. तिथे EN अशी खूण दिसत असेल तर Alt आणि Shift ह्या खुणांच्या कळा एकाच वेळी दाबून MA ही खूण आणता येईल.
ही खूण असता कळपाटाच्या कळा दाबल्या की पडद्यावर मराठी अक्षरे उमटतील. (चित्र : ४ पाहा)



चित्र : ३

कळपाटावरच्या Alt आणि Shift ह्या कळा एकत्र दाबल्या की भाषा बदलता येते. Alt आणि Shift ह्या कळा एकत्र दाबून इंग्लिशचा आणि मराठीचा पर्याय आलटून पालटून वापरता येईल.



चित्र ४

सूचना : विंडोज एक्स्पीमध्ये वर सांगितलेली कृती केवळ प्रशासकीय खात्यांतूनच (ॲडमिनिस्टर लॉगिनमधूनच) करता येते.

आपल्याकडे सामान्यतः विंडोजच्या कार्यकारी प्रणाल्यांचा वापर अधिक होत असल्याने इथे त्यांच्याविषयीची माहिती दिलेली असली तरी मराठी वापरण्याची अशी सोय आता बहुतेक सर्वच कार्यकारी प्रणाल्यांत उपलब्ध असते. आपल्या संगणकावर कोणतीही कार्यकारी प्रणाली असो. ती स्वामित्वाधीन असो वा मुक्तस्रोत असो. त्यात मराठीचा वापर करणे नक्कीच शक्य आहे आणि सोपेही आहे.

## विंडोज ७ मध्ये मराठी वापरा



चित्र : ५

०१. पुढीलप्रमाणे खुणांवर टिकटिकवा (क्लिक करा) Start > Control panel > Clock, Language, and Region > Region and Language
०२. Region and Language ह्या चौकटीत Keyboards and Languages हा भाग निवडून त्यातील Change Keyboard ह्या खुणेवर टिकटिकवा.
०३. आता Text services and Input Languages ही चौकट उघडेल. ह्या चौकटीत Installed Services ह्या भागात इंग्लिशसाठीचा कळपाट दिसतो त्याच्या उजवीकडे Add ही खूण दिसते.



चित्र : ६

०४. Add ह्या खुणेवर टिकटिकवा.
०५. तसे केल्यावर Add Input Language ही चौकट उघडेल
०६. त्या चौकटीत भाषांच्या यादीतून मराठी (Marathi) हा पर्याय पाहा आणि त्याच्या डावीकडील + ह्या खुणेवर टिकटिकवा. कळपाट(की-बोर्ड) निवडण्यासाठी keyboard ह्या खुणेखालील पर्यायांतून Marathi हा पर्याय निवडून OK ह्या खुणेवर टिकटिकवा. (चित्र : ६ पाहा)
७. उरलेल्या चौकटींतही OK ह्या खुणेवर टिकटकवून सर्व चौकटी बंद करा.
८. आता कार्यदर्शिकेवर (टास्कबारावर) EN अशी खूण दिसत असेल तर Alt आणि Shift ह्या खुणांच्या कळा एकाच वेळी दाबून MA ही खूण आणता येईल. (चित्र : ४ पाहा)
कळपाटावरच्या Alt आणि Shift ह्या कळा एकत्र दाबल्या की भाषा बदलता येते. उदा. मराठी > इंग्लिश / इंग्लिश > मराठी

विंडोजच्या विस्टा आणि त्यानंतरच्या कार्यकारी प्रणाल्यांत वरीलप्रमाणेच कृती करून मराठीत काम करण्याचा पर्याय कार्यरत करता येईल.

उपरोक्त प्रक्रिया समजावून सांगणाऱ्या काही दृक्श्राव्य शिकवण्या पुढील दुव्यावर पाहता येतील.
http://yunikodatunmarathi.blogspot.in/